| | जनसंपर्क अधिकारी<br>मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय<br>रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | |
|---|---|---|

**प्रेसनोट ३६७ - २३** **दिनांक : - २१/१०/२०२३**

## वसई विरार शहर महानगरपालिका यांचे अधिकृत असलेले चिन्हाचा वापर करुन नोकरीचे बनावट ऑफर लेटर देऊन फसवणुक करणा-या गुन्हेगारांना अटक - आचोळे पोलीस ठाणेची कामगीरी

आचोळे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामधील मधील फिर्यादी श्रीमती सुषमा अनिल विसपुते वय ४० वर्षे व्यवसाय-नोकरी रा.बी/२०५,साईभक्ती अपार्टमेंट, साईबाबा नगर,नवघर रोड,भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे यांनी आरोपीत आपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना नोकरीचे अमिष दाखवुन वसई विरार शहर महानगरपालिका येथे नोकरी लावुन देतो असे सांगुन फिर्यादी व साक्षीदार याचेकडुन पैसे घेवुन शासनाचे संबंधित वसई विरार शहर महानगरपालिका यांचे अधिकृत असलेले चिन्हाचा वापर करुन नोकरीचचे बनावट ऑफर लेटर तयार करुन विशेष अधिकारी, पालघर यांचा राजमुद्रीत गोल शिक्का मारुन बनावट दस्तऐवज तयार करुन फसवणुक केली असल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आचोळे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं.४३९/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ४२०,४६५,४७१,४६८ प्रमाणे दिनांक १२/०९/२०२३ रोजी नोंद करण्यात आला आहे

सदर गुन्हयांबाबत मा.वरीष्ठांनी गंभीर दखल घेवुन आरोपीत यांना अटक करणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. गुन्हयांतील आरोपीत यांचे पुर्ण नाव, पत्ते उपलब्ध नसताना तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीत यांचा शोध घेवुन त्यांची नावे निष्पन्न करुन आरोपीत नामे १) विजय गंगाराम जाधव वय ३३ वर्षे रा.रुम नं.१०१, फेज नं.०१, चंद्रेश हेरिटेज, संयुक्तनगर नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर २) सुरज रघुनाथ जाधव वय ३१ वर्षे रा.रुम नं.१३, सिद्धेश्वर चाळ, नगीनदास पाडा नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर ३) महेश रविद्र जाधव वय २७ वर्षे रा.रुम नं.१०१, नवदुर्गा बिल्डींग नं.५, नगीनदास पाडा नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर यांना दिनांक १७/१०/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

नमुद गुन्ह्यातील अटक आरोपीत यांनी आपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना नोकरीचे अमिष दाखवुन वसई विरार शहर महानगरपालिका येथे नोकरी लावुन देतो असे सांगुन फिर्यादी व साक्षीदार यांचेकडुन पैसे घेवुन शासनाचे संबंधित वसई विरार शहर महानगरपालिका यांचे अधिकृत असलेले चिन्हाचा वापर करुन नोकरीचे बनावट ऑफर लेटर तयार करुन विशेष अधिकारी, पालघर यांचा राजमुद्रीत गोल शिक्का मारुन बनावट दस्तऐवज तयार करुन फसवणुक केली आहे. गुन्हयांचे तपासात अद्याप पावेतो फिर्यादी यांचेसह एकुण १० लोकांची फसवणुक केलेचे निष्पन्न झाले असुन आरोपीत यांनी आणखी काही लोकांची फसवणुक केलेची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मा.श्रीमती पोर्णिमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त सो. परीमंडळ-२ वसई, श्री.विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त सो. तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली आचोळे पोलीस ठाणेचे श्री.बाळासाहेब पवार वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पोलीस उपनिरीक्षक रेखा पाटील, पो.अं. शिवराम शिंदे यांनी केली आहे.